# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## वार्षिक अहवाल

## योग विभाग

**योगशिक्षक प्रमाणपत्र अभ्यास वर्ग** (२० फेब्रुवारी २०२३ ते २३ मार्च २०२३)

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय व जिल्हा योग संघटना औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने **योगशिक्षक प्रमाणपत्र अभ्यास वर्ग** (२० फेब्रुवारी २०२३ ते २३ मार्च २०२३) या कालावधीत घेण्यात आला. सर्वप्रथम विद्यार्थिनींशी वर्गासाठी संवाद साधण्यात आला. योगाचे महत्त्व सांगण्यात आले. या वर्गास विद्यार्थिनी चांगला प्रतिसाद दिला. एकूण ३० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

दिनांक २० फेब्रुवारी २०२३ रोजी योगवर्गाचे उद्घाटन करण्यात आले. योगाचार्य अलका साळुंके-कदम यांनी उद्घाटनपर भाष्य केले. “कोरोनोत्तर योगाचे महत्व” या विषयावर त्यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर हे होते.

दिनांक २२ फेब्रुवारी २०२० रोजी मनीष कुमार (सौष्ठव आंतराष्ट्रीय योग संघटना, औरंगाबाद) यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेतले. दिनांक ४ मार्च २०२३ रोजी श्रीमती कविता लाड (योगाचार्य ए बी एस फिटनेस क्लब, औरंगाबाद) यांनी प्रशिक्षणार्थींना “योग दैनंदिनी” या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी “रोल ऑफ योगा इन एज्युकेशन” हे प्रकरण शिकविले. दिनांक ११ मार्च २०२३ रोजी श्रीमती लता वाघचौरे (सदस्य पतंजली योग समिती, औरंगाबाद) यांनी आसने , प्राणायाम याचे प्रशिक्षण दिले. दिनांक १६ मार्च २०२३ रोजी कुमारी अवंतिका वर्मा यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी ‘यौगिक पंचकर्म’ या विषयावर मार्गदर्शन केले. दिनांक १८ मार्च २०२३ रोजी श्रीमती कावेरी जाधव यांनी विद्या प्राप्तीसाठी योगाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.

या कोर्सचा संपूर्ण अभ्यासक्रम डॉ. राजश्री पवार तसेच डॉ. संदीप जगताप यांनी प्रात्यक्षिक तसेच थेअरी या पद्धतीने शिकविला. प्रशिक्षणार्थींची प्रात्यक्षिक तसेच थेअरी परीक्षा घेण्यात आली.

या कोर्सचा समारोपचा कार्यक्रम २० मार्च २०२३ रोजी घेण्यात आला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश मिरकर (जिल्हा योग संघटना, औरंगाबाद) हे उपस्थित होते तसेच अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस आर टकले यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

डॉ. राजश्री पवार
डॉ. संदीप जगताप
योग विभाग

प्राचार्य










**योगशिक्षक प्रमाणपत्र अभ्यास वर्ग (२० फेब्रुवारी २०२३ ते २३ मार्च २०२३)**

डॉ. राजश्री पवार — प्राचार्य

डॉ. संदीप जगताप

योग विभाग